महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महापारेषण समाचार

वर्ष-१० अंक-५ ऑगस्ट - सप्टेंबर २०१६

प्रिय कर्मचारी बंधु आणि भगीनींनो,

आपणा सर्वांना दिपावलीच्या शुभेच्छा. सर्वांना शुभ व सुरक्षित दिपावली.

चालु वित्तीय वर्षाचे दोन तिमाही संपले आहेत, आता उर्वरीत दोन तिमाही आपल्याला अत्यंत महत्वाचे आहेत. आपल्याला ठरवुन दिलेली कामे जलद गतीने करण्यास हा काळ फायदेशीर ठरत असतो. करीता सर्व विभाग प्रमुखांनी त्यांच्या अर्धवर्षीय कामकाजाचे मोजमाप करूण पुढची दिशा, नियोजन, कृती आराखडा तयार करणे महत्वाचे असते.

आपल्या कामगिरीवर आपल्याशी संलग्नीत असलेल्या महावितरण व महानिर्मीती यांची कामगिरी अवलंबुन असते. त्यामुळे आपली पायाभुत सुविधा नियोजनानुसार उपलब्ध करून दिल्यास त्याचा वापर ह्या दोन कंपन्या चांगल्या प्रकारे करू शकतात.

या काही दिवसात आपण प्रत्येक विभागाचा सखोल अभ्यास केला. त्यांच्या कामाच्या पद्धती तसेच अडचणी समजुन घेतल्या व अनेक बाबींवर ऊहापोह करून मार्ग काढण्यात आलेला आहे तसेच कामे चांगल्या पद्धतीने कशी मार्गी लागतील त्याकरीता सुधारणा व नवीन रचनात्मक निर्देश जारी केले आहेत. मला आशा आहे त्याचे चांगले फल-स्वरूप आपल्याला काही दिवसात पाहण्यास मिळेल.

प्रकल्प अभियंता यांच्या सक्षमीकरणा करीता अभिनव कार्यक्रम लवासा सीटी, पुणे येथे नुकताच आयोजीत करण्यात आला होता. त्यांचे चांगले फायदे आपल्या अभियंत्यांना त्यांची कार्यक्षमता वाढविण्याकरीता होईल अशी मला खात्री आहे. त्याबरोबरच व्यवस्थापनाचे प्रशिक्षण अभियंता व अधिकारी यांना IIM-A व Power Grid यांच्या कडून देण्यात येत आहे त्याचाही फायदा आपल्या दैनंदिन व्यवस्थापनामध्ये निपुणता आणण्या करीता होईल.

पुढेही अनेक अभिनव कार्यक्रम आपली कुशलता वाढविण्या करीता आयोजीत करण्यात येत आहेत. आपल्याला देण्यात आलेल्या ज्ञानाचे आपल्या कार्यात उपयोग करून आपली कार्यकुशलता वाढविणे अपेक्षीत आहे व त्याचा फायदा कंपनीला चांगल्या कामगिरीच्या स्वरूपात मिळेल असे अपेक्षीत आहे.

आज अनेक बदल होत असतांना आपण पाहतो ह्या बदलास आपल्याला सामोरे जावुन त्यांचा सकारात्मक अभ्यास करून, आपल्या कार्यपद्धती मध्ये सुनियोजित बदल करून त्यांचा फायदा कंपनी करीता करून घेता आला पाहीजे.

संचलन व सुव्यवस्था भरीव ठेवणे गरजेचे राहते जेणे करून प्रणाली अविरत सेवा देवू शकेल. आगावु सर्व कामाचे नियोजन व कृती केल्यास Break Down व Interpution कमी होण्यास मदत होते. त्याकरीता कामाची नियमीतता असणे गरजेचे राहते.

जिवीतास इजा/धोका, प्रणालीचे नुकसान होता कामा नये. अपघात विरहीत कामे होणे गरजेचे राहते. विभाग प्रमुखांनी त्याकरीता कटाक्षाने Safety प्रणालीचा पाठपुरावा व अमंलबजावणी करणे गरजेचे राहते. आज दुर्गम भागात आपल्या प्रणालीचे जाळे आहे. त्याची डागडुजी/देखभाल करणे आव्हानात्मक आहे, परंतु तीच आपली सचोटी असते. त्यांचा प्रदीर्घ



**राजीव कुमार मित्तल**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

अनुभव आपल्या गाठीशी आहे. त्या अनुभवावर आपल्याला नवीन पिढीला तयार करायचे आहे, जेणे करून पुढेही ही प्रणाली अविरत देखभाल सुनिश्चित करण्यास मदत होईल.

प्रकल्प संदर्भात अनेक रचनात्मक बदल करण्यात आलेले आहेत, जेणे करून आपले प्रकल्प नियोजीत कालावधीत पुर्ण होतील. सांघिक कार्यालय प्रकल्प विभागाकडून लवकरच पुस्तिका उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे प्रकल्पीय कामात त्याचा चांगला उपयोग होईल अशी मला आशा आहे.

पुन्हा एकदा आपल्या सर्वांना पुढील कामगिरी करीता शुभेच्छा।

**राजीव कुमार मित्तल**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

## एक दिवसाचे "OLTC Working & Operation" विषयक प्रशिक्षण वर्गाचे उपकेंद्र वाघाळा, नांदेड येथे आयोजन



दि. २९.०८.२०१६ रोजी २२० के.व्ही. उपकेंद्र वाघाळा येथे एक दिवसाचे "OLTC Working & Operation" चा वापर संदर्भिय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेचे उद्घाटन मा. श्री. ओमप्रकाश के. एम्पाल साहेब, संचालक (संचलन), महापारेषण यांचे शुभहस्ते झाले. मुख्य अभियंता, औरंगाबाद परिमंडळ, श्री. जी. टी. मुंडे साहेब तसेच अधीक्षक अभियंते, श्री. वसेकर साहेब, श्री. कादरी साहेब, श्री. एस. बी. स्वामी साहेब हे उपस्थीत होते. कार्यक्रमाचे सुत्र



संचलन कु. सुप्रांजना एल. चव्हाण, सहाय्यक अभियंता यांनी केले. एक दिवसाच्या या प्रशिक्षण वर्गात M/S CTR, Pune. तर्फे श्री. चीमाटे साहेब, यांनी "OLTC Working & Operation" संदर्भात सविस्तर माहिती दिली.

श्री. भोपाळे साहेब, कार्यकारी अभियंता, सांघिक कार्यालय मुंबई यांनी "OLTC Operation" विषयी सखोल मोलाचे मार्गदर्शन देऊन उपस्थित अभियंत्यांचे शंका निरसन केले. त्यामुळे या कार्यक्रमात उपस्थित उपकेंद्र प्रमुख यांच्या आवश्यकते नुसार On Load Tap Changing करण्याविषयीची



मनातील भिती दूर झाली. "OLTC Working & Operation" बाबत M/S CTR, Pune. यांच्यातर्फे Power Point Presentation, Hotel Manju, MIDC Nanded येथे सादर करण्यात आले. त्यानंतर प्रात्यक्षिक दुपारच्या सत्रात २२० केव्ही उपकेंद्र वाघाळा येथे ५० MVA Vijay make Transformer वर आऊटेज घेऊन दाखविण्यात आले. या वेळेस OLTC Assembly क्रेंन द्वारे बाहेर काढून Diverter Switch द्वारे कसे ऑपरेशन घडते या विषयी सविस्तर माहिती देण्यात आली.

या कार्यशाळेसाठी संपूर्ण औरंगाबाद परिमंडळातील संघ विभागांचे कार्यकारी अभियंते, अति संवेदनशील उपकेंद्रातील उपकेंद्र प्रमुख व प्रत्येक विभागातून पाच ते सहा अभियंते उपस्थित होते.



सदर कार्यशाळेचे आयोजन मा.श्री. एस. बी. स्वामी, अधीक्षक अभियंता, अउदा संवसु मंडळ परळी वै. यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यशाळा यशस्वी करण्याकरीता श्री. एस. आर. रामटेके, कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग नांदेड, श्री. ए. ए. खान, अति कार्यकारी अभियंता २२० केव्ही उपकेंद्र वाघाळा व येथील सर्व अधिकारी / कर्मचारी वर्ग यांनी परिश्रम घेतले.

# ३२ व्या पश्चिम क्षेत्रीय विद्युत समितीची बैठक पुणे येथे संपन्न





पश्चिम क्षेत्रीय विद्युत समितीची ३२ वी बैठक दि. २३ व २४ ऑगस्ट २०१६ दरम्यान हॉटेल गेटवे, पुणे येथे पार पडली. या बैठकीची सुरवात दि. २३ ऑगस्ट २०१६ रोजी टी. सी. सी. च्या बैठकीने झाली.

पश्चिम क्षेत्रीय विद्युत समितीचे बैठकीचे आयोजन महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी तर्फे करण्यात आले होते. दि. २३ ऑगस्ट २०१६ रोजी तांत्रिक समन्वय समितीची बैठक पार पडली. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री. ओमप्रकाश के. एम्पाल साहेब, संचालक (संचलन), महापारेषण हे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरवात ही पश्चिम क्षेत्रीय विद्युत समितीच्या पदाधिकारी, सदस्य व तांत्रिक समन्वय समिती चे पदाधिकारी व सदस्य यांच्या स्वागताने झाली. यानंतर कार्यक्रम स्थळी अध्यक्ष, उपस्थित पदाधिकारी व सदस्य यांच्या उपस्थितीत दीप प्रज्वलन करून झाली. कार्यक्रमाच्या सुरवातीस प्रास्ताविकाच्या माध्यमातून कार्यक्रमाची रूपरेषा व विषयांची सविस्तर मांडणी केली. याबरोबरच अध्यक्षीय भाषणातून तांत्रिक समन्वय समितीची उददीष्टयै व ध्येय धोरणे स्पष्ट करतांनाच समितीच्या कार्यकाळाचा व कामाच्या प्रगतीचा धावता आढावा घेवून उपस्थितांना मार्गदर्शन केले. यानंतर उपस्थितांना पुण्यातील पर्यटन स्थळांची सहल घडवून आणण्यात आली.

दि. २४ ऑगस्ट २०१६ रोजी याच ठिकाणी पश्चिम क्षेत्रीय विद्युत समिती ची बैठक पार पडली. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मा. श्री. संजीव कुमार, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित व अध्यक्ष, पश्चिम क्षेत्रीय विद्युत समिती हे होते. दीप प्रज्वलन करून कार्यक्रमास झाली. कार्यक्रमाच्या सुरवातीस प्रास्ताविकाच्या माध्यमातून कार्यक्रमाची रूपरेषा व विषयांची सविस्तर मांडणी करतांनाच कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल पश्चिम क्षेत्रीय विद्युत समितीच्या वतीने सदस्य सचिव, श्री. एस. डी. ताकसांडे यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचे आभार व्यक्त करून महापारेषण कंपनीने उत्कृष्ट आयोजन केल्याचे आवर्जून सांगितले. याबरोबरच अध्यक्षीय भाषणातून मा. श्री. संजीव कुमार, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित व अध्यक्ष, पश्चिम क्षेत्रीय विद्युत समिती पश्चिम क्षेत्रीय विद्युत समितीची उददीष्टयै व ध्येय धोरणे स्पष्ट करतांनाच समितीच्या कार्यकाळाचा व कामाच्या प्रगतीचा धावता आढावा घेवून उपस्थितांना मार्गदर्शन केले.

सदर सभे अंतर्गत दोन दिवशीय कार्यशाळे दरम्यान विविध विषयांवर सखोल चर्चा पार पडली. यात विद्युत क्षेत्रात येणाऱ्या अडचणीची विषयवार मांडणी करून प्रत्येक बाबीवर चर्चा घडवून, उपाययोजना सुचवुन नवीन तंत्रज्ञान व अनुभव यातून माहितीचे आदान प्रदान करण्यात आले.

## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती/निवृत्ती माहे ऑगस्ट / सप्टेंबर-२०१६

| नियुक्ती- | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | नाव | पद | पद स्थापनेचे ठिकाण | दिनांक |
| १. | निरंक | - | - | - |
| निवृत्ती- | | | | |
| अ.क्र. | नाव | पद | पद स्थापनेचे ठिकाण | दिनांक |
| १. | निरंक | - | - | - |

# प्रकल्प अभियंता करीता अभिनव कार्यक्रमाचे आयोजन लावासा सीटी, पुणे

प्रकल्प अभियंता यांच्या सक्षमीकरणा करीता व्यवस्थापनाने संचालक (प्रकल्प) यांनी दिलेल्या निर्देशानुसार दोन दिवसीय निवासी ‘Projects Engineers Summit 2016’ ह्या अभिनव




कार्यक्रमाचे आयोजन दि. ३०.०९.२०१६ - ०१.१०.२०१६ रोजी लावासा सीटी, पुणे येथे करण्यात आले.

ह्या कार्यक्रमास अमरावती व नागपुर परिमंडळाचे प्रकल्प अभियंता यांना आमंत्रित करण्यात आले होते.

ह्या कार्यक्रमाचे प्रमुख मागदर्शक श्री. रविंद्र चव्हाण, संचालक (प्रकल्प) यांनी प्रकल्प व्यवस्थापना बद्दल अनमोल मार्गदर्शन उपस्थितांना केले. तसेच इतर ही तज्ज्ञ मान्यवरांनी प्रकल्प बांधणी विषयक मोलाचे



मार्गदर्शन केले. ह्या कार्यक्रमाचे उद्घाटनास कार्यकारी संचालक (मा. सं.) श्री. सुरज वाघमारे यांची उपस्थिती लाभली. संपूर्ण कार्यक्रम संचालन (प्रकल्प) यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडण्यात आला.

# नाशिक परिमंडळ कार्यालयात सर विश्वेशरैया यांची जयंती साजरी करण्यात आली





दिनांक १५.०९.२०१५ रोजी प्रख्यात अभियंता व भारतरत्न सर विश्वेशरैया यांची जयंती मुख्य अभियंता अउदा बांधकाम नि संवसु परिमंडळ नाशिक येथील मुख्य कार्यालयामध्ये मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता, श्री. बी. टी. राऊत साहेब यांनी सर विश्वसरैया यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास सुरूवात झाली.

यावेळी कार्यक्रमास परिमंडळातील अभियंते, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. परिमंडळ कार्यालयातील मिटींग हॉलमध्ये श्री. सर विश्वेशरैया यांच्या कामगिरी विषयक एक चित्रफित दाखविण्यात आली. त्यांनी केलेल्या कार्याची माहिती या द्वारे उपस्थितांना देण्यात आली. यावेळी श्री. वसेकर, श्री. नवलाखे, श्री. सुतार, श्री. साठे उपस्थित होते.

अशा या महान अभियंत्यास त्यांनी देशाच्या विकासासाठी केलेल्या अद्वितीय कामाची व त्यागाची पावती म्हणून त्यांना भारत सरकारने भारतरत्न पुरस्कार देवून त्यांचा भारताचे पंतप्रधान मा. पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. अशा या थोर अभियंत्यास कोटी कोटी प्रणाम.

# करार प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र आणि वालचंद व अण्णासाहेब डांगे अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्यात प्रशिक्षणासाठीचा सामंजस्य करार







कराड परिमंडळाच्या प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, कोल्हापुर आणि वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली व अण्णासाहेब डांगे अभियांत्रिकी महाविद्यालय आष्टा, सांगली यांच्या दरम्यान माहितीची देवाण घेवाण व इलेक्ट्रीकल व इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलीकम्युनिकेशन अभियांत्रिकी या विषयातील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असणाऱ्या प्रशिक्षणासंदर्भात सहमतीच्या मसुद्यावर स्वाक्षरी करण्यात येऊन सामजंस्य करार करण्यात आला.

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली यांचे तर्फे संस्थेचे संचालक, मा. श्री. परिषवाड व विभागप्रमुख श्री. मोरे, श्री. वैद्य, श्री. मोहल सर उपस्थित होते. तसेच अण्णासाहेब डांगे अभियांत्रिकी महाविद्यालय, आष्टा यांचेकडुन प्राचार्य श्री. मुल्ला व विभागप्रमुख श्री. नितीन सापगावे उपस्थित होते. यावेळी महापारेषण कडुन श्री. संदीप हाके, अधीक्षक अभियंता तसेच प्रशिक्षण केंद्र समन्वयक, श्री. सुनिल माने उपस्थित होते.

यावेळी वालचंद्र अभियांत्रिकी महाविद्यालय संस्थेचे संचालक, मा. श्री. परिषवाड यांनी पुढील कालावधीमध्ये अभियांत्रिकी विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक ज्ञानामध्ये वाढ व्हावी व विद्यार्थ्यांना औद्योगीक कामाचा प्रत्यक्षात अनुभव मिळावा या दृष्टीने हे अत्यंत महत्तवाचे पाउल ठरावे असे सांगुन महापारेषण च्या या प्रशिक्षण उपक्रमाचे कौतुक करुन अशा विविध शासकीय, निम्न शासकीय व खाजगी संस्था यांनी एकमेकांना बरोबर घेऊन अशा प्रकारची विविध क्षेत्रातील सामजंस्य करार करून एकमेकांचा विकास घडवुन आणवा असे स्पष्ट करतानां महापारेषणच्या एकंदरीत कामाबाबत गौरोद्गार काढले.


वालचंद अभियंत्रिकी महाविद्यालयाच्या तृतीय वर्षाच्या इलेक्ट्रीकल शाखेच्या प्रत्येकी ३० विद्यार्थ्यांची बॅच दि. ९.१०.२०१६ व १०.१०.२०१६ तसेच ११.१०.२०१६ व १२.१०.२०१६ या दरम्यान पुर्ण करण्यात आल्या. सदरच्या बॅचचा कालावधी हा सार्वजनिक सुट्ट्यांचा असुन सुद्धा महापारेषणच्या सर्व संबंधीत कर्मचारी यांनी प्रशिक्षण शिबीराचे यशश्वी आयोजन व ते पुर्ण केल्याबाबत कराड परिमंडळाचे मुख्य अभियंता, श्री. यशवंत गजभीये व कार्यकारी संचालक, श्री. सुरज वाघमारे यांनी विशेष कौतुक केले.

कराड परिमंडळाच्या प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, कोल्हापुर प्रमुख श्री. कुलकर्णी, समन्वयक, श्री. सुनिल माने यांनी विशेष परिश्रम घेतले. या प्रशिक्षणासाठी श्री. कोळी, श्री. डहाके, श्री. सुतार, श्री. रणजीत जाधव, श्री. दिगंबर पुजारी, श्री. प्रविण पुजारी यांचे सहकार्य लाभले. सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वितरण श्री. संदीप हाके, अधीक्षक अभियंता यांचे हस्ते करण्यात आले.





**In picture , Dr. S. S. Kulkarni, CE-MSLDC alongwith Shri V D Pande, SE(SCADA/Adm-IT), MSLDC Garlanding Mahatma Gandhi & Shri Lal Bahadur Shastri on the Occasion of their birth Anniversary**



## अउदा प्रकल्प नि. संवसु परिमंडळ, नागपूर कार्यालयाचे नविन जागेत स्थानांतरित झालेल्या कार्यालयाचे उद्घाटन





मुख्य अभियंता, अउदा प्रकल्प नि.संवसु परिमंडळ, नागपूर कार्यालयाचे मानकापुर पॉवर हाऊस परिसर, कुणाल हॉस्पीटल समोर छिंदवाडा रोड मानकापूर, नागपूर येथे स्थानांतरित झालेल्या कार्यालयाचे उद्घाटन मा. मुख्य अभियंता, श्री. एम.एन.बहादूरे, अउदा प्रकल्प नि. संवसु परिमंडळ नागपूर यांचे हस्ते दि. १४.१०.२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता झाले. या प्रसंगी, श्री. ए.एम.कोंडावार, अधिक्षक अभियंता, अउदा संवसु प्रविभाग, नागपूर, श्री. एम. आर. भगत, अउदा स्था. बांध. नि.सु. प्रविभाग, नागपूर, श्रीमती. पी. एम. बुंदाले, कार्यकारी अभियंता (प्रशासन), अउदा प्रकल्प नि. संवसु परिमंडळ नागपूर, श्री. पी.एम. चीक्षे सहा.महाव्यवस्थापक (विवले), अउदा प्रकल्प नि. संवसु परिमंडळ, नागपूर, श्री. अ. के. रोही, सहा. माहव्यवस्थापक (मासं), अउदा प्रकल्प नि.संवसु परिमंडळ, नागपूर हजर होते. तसेच परिमंडळातंर्गत असलेल्या प्रविभाग व विभागातील सर्व तांत्रिक, लेखा व आस्थापना विभागातील बहुसंख्य अधिकारी / कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. या प्रसंगी बोलतांना श्री. एम.एन. बहादुरे, मुख्य अभियंता यांनी आपले मनोगत व्यक्त केले व नविन जागेत कंपनीच्या भरभराटीसाठी अधिक जोमाने कार्य करण्यास प्रोत्साहित केले तसेच सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांने कार्यालयात आनंदी आणि उत्साही वातारण कायम राखण्यावर भर देण्याचे आवाहन करण्यात आले

या प्रसंगी स्थापत्य विभागचे अधिक्षक अभियंता, श्री. एम. आर. भगत, कार्यकारी अभियंता, श्री. दामके साहेब, श्री. पिल्लेवान साहेब, श्री. रोही साहेब, श्री. चिक्षे साहेब व सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी आपले मोलाचे सहकार्य दिले त्यांचे आभार मानण्यात आले. उपरोक्त कार्यक्रम सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पुढाकाराने यशस्वीरीत्या पार पडला.

## मुस्कुराहट का महत्व

- अगर आप एक अध्यापक हैं और जब मुस्कुराते हुए कक्षा में प्रवेश करेंगे तो देखिये सारे बच्चों के चेहरों का मुस्कान छा जाएगी।
- अगर आप डॉक्टर हैं और मुस्कराते हुए मरीज़ का इलाज करेंगे तो मरीज़ का आत्मविश्वास दोगुना हो जायेगा।
- अगर आप एक ग्रहणी हैं तो मुस्कुराते हुए गर का हर काम किजिये फिर देखना पूरे परिवार में खुशियों का माहौल बन जायेगा।
- अगर आप घर के मुखिया हैं तो मुस्कुराते हुए शाम को घर में घुसेंगे तो देखना पूरे परिवार में खुशियों का माहौल बन जायेगा।
- अगर आप एक बिजनेसमैन हैं और खुश होकर कंपनी में घुसते हैं तो देखिये सारे कर्मचारियों के मन का प्रेशर कम हो जायेगा और माहौल खुशनुमा हो जायेगा।
- अगर आप दुकानदार हैं और मुस्कुराकर अपने ग्राहक का सम्मान करेंगे तो ग्राहक खुश होकर आपकी दुकान से ही सामान लेगा।
- कभी सड़क पर चलते हुए अनजान आदमी को देखकर मुस्कुराएं, देखिये उसके चेहरे पर भी मुस्कान आ जाएगी।
- मुस्कुराइए क्यूंकि मुस्कुराहट के पैसे नहीं लगते ये तो खुशी और संपन्नता की पहचान है।
- मुस्कुराइए क्यूंकि ये जीवन आपको दोबारा नहीं मिलेगा।
- मुस्कुराइए क्यूंकि आपकी मुस्कराहट कई चेहरों पर मुस्कान लाएगी।
- मुस्कुराइए क्यूंकि ये जीवन आपको दोबारा नहीं मिलेगा।
- मुस्कुराइए क्यूंकि क्रोध में दिया गया आशीर्वाद भी बुरा लगता है और मुस्कुराकर कहे गए बुरे शब्द भी अच्छे लगते हैं।
- मुस्कुराइए क्योंकि दुनिया का हर आदमी खिले फूलों और खिले चेहरों को पसंद करता है।
- मुस्कुराइए क्यूंकि आपकी हँसी किसी की खुशी का कारण बन सकती है।
- मुस्कुराइए क्यूंकि परिवार में रिश्ते तभी तक कायम रह पाते हैं जबतक हम एक दूसरे को देख कर मुस्कुराते रहते हैं।
- और सबसे बड़ी बात
- मुस्कुराइए क्यूंकि यह मनुष्य होने की पहचान है। एक पशु कभी भी मुस्कुरा नही सकता।
- इसलिए स्वयं भी मुस्कुराए और औरों के चेहरे पर भी मुस्कुराहट लाएं।

**श्री. इमाम सिद्धीकी**
सहाय्यक महाव्यवस्थापक
द्वारा संकलीत

# ४१ व्या अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या कॅरम स्पर्धा (पुरूष) यशस्वीरित्या पार पडल्या.




४१ व्या अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या कॅरम स्पर्धा (पुरूष) या स्पर्धांचे आयोजन मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, श्री. राजीव कुमार मिŸल, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, यांच्या मार्गदर्शनाखाली औद्योगिक संबंध विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांनी दि. २०.०९.२०१६ ते २२.०९.२०१६ या कालावधीत वसई येथे आयोजीत केल्या होत्या.

४१ व्या अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या कॅरम स्पर्धेच्या उदघ्राटन समारंभ कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. रविंद्र चव्हाण, संचालक (प्रकल्प), महापारेषण यांच्या हस्ते कॅरम बोर्ड वरील फीत कापून करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रसंगी श्री. सुरज वाघमारे, कार्यकारी संचालक (मा.सं), महापारेषण चे मुख्य सुरक्षा अधिकारी लेप्ट. कर्नल (निवृत्त), श्री. संजय कुमार, महावितरणचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. संजय ढोके हे आवर्जुन उपस्थित होते.



स्पर्धेच्या उदघाटन समारंभ प्रसंगी अध्यक्षांनी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना कॅरम व मानवी जिवनातील साम्य यावर भाष्य केले. मानवी जिवनातील प्रत्येक पैलु कसे कॅरम या खेळातील नियमांप्रमाणे मानवी जिवनाशी साधर्म्य सांगत असतात. हे देखील विविध उदाहरणासह स्पष्ट केले.

या स्पर्धेमध्ये भारतातील विविध राज्यांमधील वीज कंपन्या / वीज मंडळे यांनी आपले गुणवाण खेळाडुंचा चमू पाठवून सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेत एकूण १६ संघांनी सहभाग नोंदविला होता. सहभागी संघामध्ये चुरसिचे व अटीतटीचे सामने झाले.

स्पर्धेतील अंतिम सामने दि. २२.०९.२०१६ रोजी खेळविले गेले. याच




दिवशी सायंकाळी ५.०० वाजता सदर स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ संपन्न झाला. या समारंभाचे अध्यक्षस्थानी मा. श्री. संजय शिंदे, मुख्य अभियंता, वाशी परिमंडळ, प्रमुख पाहुणे शिव छत्रपति पुरस्कार श्री. अरूण केदार व स्पर्धा निरीक्षक श्री. ललित गायकवाड हे उपस्थित होते.

कॅरम टीम इव्हेंट या खेळ प्रकारात रिलायंन्स एनर्जी, मुंबई या संघाने अंतिम विजेतेपद मिळविले. तर तमिळनाडू निर्मीती संघाने उपविजेते पद मिळविले. याच बरोबर तेलंगाना निर्मीती या संघाने तृतिय पारितोषिक मिळविले.

कॅरम सिंगल या खेळ प्रकारात प्रथम विजेतेपद श्री. नरसिंग राव साकारी, रिलायंन्स एनर्जी यांना तर उपविजेते पद श्री. महम्मद अली, तमिळनाडू निर्मीती आणि तृतिय पारितोषिक श्री. अनंत गायत्री, महावितरण, महाराष्ट्र यांनी पटकाविले. वरील सर्व विजेत्यांना अनुक्रमे सुवर्ण, रजत व कास्यं पदके देवून गौरविण्यात आले.





सदर स्पर्धेच्या आयोजन समितीचे मुख्य समन्वयक श्री. अनंत पाटील, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, समितीचे कार्याध्यक्ष, श्री. भरत पाटील, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, समितीचे सचिव श्री. प्रविण पाटील, क्रीडा सहाय्यक, समितीच्या कोषाध्यक्षा श्रीमती हर्षदा वझे, व्यवस्थापक (मा. सं.), सह कोषाध्यक्ष श्री. विद्याधर मेढेकर, व्यवस्थापक (विवले) व सदस्य सर्वश्री. अशोक साळुंखे, रुपेश गजरे, दिग्विजय मेस्त्री, विनय खेडेकर, डी. एम. कदम, सुनिल नेहरकर, रविंद्र आम्रे, सुनिल, गडलिंग, प्रदीप शिंदे, किशोर महाबोले, विठठल सोनावणे, सुनिल पवार सर्वश्रीमती गार्गी देशपांडे, अमृता मेस्त्री, रीटा आरस यांनी मोलाचे योगदान दिले आहे.

# माणुसकी



मनुष्य हा अत्यंत घातक व त्याबरोबरच साधक प्राणी आहे. माणुसकी म्हणजे 'मनुष्यधर्म" पाळणे की ज्यामुळे तो साधक होवुन सर्वांना त्याकडे असलेल्या साधनाचा चांगला उपयोग करून, साध्य प्राप्त करण्यास मदत करणे होय.

साधक अनेक प्रकारे होवू शकतो. समोरच्या व्यक्तीच्या भावना जपणे ह्यामध्ये सुद्धा साधकता असते. मदत करणे, सहकार्य, बंधुता, आदर, कृतज्ञता व प्रेम साधकाच्या स्वरूपात प्रर्दशीत होत असतात.




अनेक प्रकारे मनुष्य इतर मनुष्याच्या उपयोगी पडू शकतो. कोणाच्या उपयोगी येणे हे एक जणु भाग्यच असते. आपल्या परी असलेल्या कर्तव्यांचे पालन हे सुद्धा आपल्यातल्या माणुसकीचे दर्शन घडवत असते. चांगले व्यक्तिमत्व व माणुसकीचा संबंध नाही. दायक तसेच अदायक, दुर्बल / सबल त्यांचाही संबंध नाही. संबंध आहे तो प्रेमभावाचा. वैऱ्यासोबत सुद्धा चांगले वर्तन केल्यास त्यांचे वैमनस्य संपुष्टात येते. आपण एका सुनिश्चित काळा करीता ह्या ग्रहावर आहोत त्याचे भान आपल्याला ठेवणे गरजेचे आहे. त्यानंतर राहतात आपल्या



आठवणी. आपण दुसऱ्याच्या स्मरणात राहणे ही आपली योग्यता असते नाही, तर अनेकांचा विसर आपल्याला होत असतो.

किती वस्तु जमाविल्या त्यापेक्षा किती माणसे जमविली हे अधिक महत्वाचे ठरते. सरते शेवटी ही माणसे उपयोगी पडत असतात. स्वार्थ जिवनातली सर्वात मोठी कमजोरी व सदाचार माणुसकी सर्वात मोठी शक्ति ठरते.

दिपावली शुभेच्छां सह!




From the Desk of ED, HR

संपादक : श्री.संदीप नरडेले, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत,
महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं. सी. - १९, ई. ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by PRO For Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,
Printed at Hema Arts : 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka,
W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai - 400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra Kurla Complex, Mumbai - 400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.